जा.क्र./स्वयं अर्थ/वर्ग वाढ/ ११४९
प्राथमिक शिक्षण समिती, महानगरपालिका,
कोल्हापूर. दिनांक २५/९/२०२०

280920

प्रति,
मुख्याध्यापक,
डॉ.डी.वाय.पाटील विद्यानिकेतन,
साळोखेनगर, कोल्हापूर

विषय :- स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) अधिनियम २०१२ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२० – २०२१ करीता इ. ८ वी च्या वर्गवाढीस मान्यता..

संदर्भ :- १) आपलेकडील प्रस्ताव जा.क्र.८२ ,दि.२४.०९.२०२०.
२) या कार्यालयाकडील पत्र जा.क्र./खाप्राशा/प्रथम मा/१७५०,दि.१८.११.२०१९
३) मा.शिक्षण उपसंचालक,को.वि.,कोल्हापूर यांचे परवानगी पत्र जा.क्र.प्राथ/माध्य/ उमा/५७४४, दि.०५.०७.२०१८
४) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग कडील शासन शुध्दीपत्र क्रमांक एसएफ एस-१०१८/प्र.क्र.१३९२/एसएम-२, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई, दि.१९ नोव्हेंबर २०१८

उपरोक्त विषयाबाबत आपलेकडील संदर्भ क्रमांक १ च्या प्रस्तावास अनुसरुन आपणास कळविणेत येते की, संदर्भ क्रमांक ३ अन्वये डॉ.डी. वाय.पाटील विद्यानिकेतन, कोल्हापूर या नावे शासनस्तरावरुन स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर इंग्रजी माध्यमाची शाळा प्राथमिक ते माध्यमिक (राज्य मंडळ) सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन या कार्यालयाकडून संदर्भ क्रमांक २ अन्वये इ. १ ली ते ७ वी च्या प्रथम वर्गासह प्रथम मान्यता देण्यात आलेली आहे. शासनाकडील संदर्भ क्रमांक ४ अन्वये शाळेची मंडळ संलग्नता राज्यमंडळ ऐवजी सी.बी.एस.ई. अशी सुधारीत करण्यात आलेली आहे. यास्तव आपल्या शाळेतील इयत्ता ८ वी च्या प्रथम वर्गास सन २०२०-२१ पासून खालील अटी व शर्तीस अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

| अ क्र | उच्च प्राथमिक शाळेतील मंजूर केलेला वर्ग | माध्यम | मंजूरीचे तत्व | मंजूर वर्ग संख्या | मंडळ संलग्नता | मंजूरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | इयत्ता ८ वी | इंग्रजी | स्वयं अर्थ सहाय्यित तत्वावर | एक | सी.बी.एस.ई. | सन २०२० - २१ |

**अटी :-**

१) सदरची मान्यता ही संस्था / शाळास्तरावरुन सादर केलेल्या माहितीच्या आधारे देण्यात येत असून सादर केलेली माहिती चूकीची आहे असे निदर्शनास आल्यास तसेच माहितीमध्ये काही तफावत आढळल्यास देण्यात आलेली मान्यता रद्द करण्यात येईल. त्यामूळे काही पेचप्रसंग निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था व शाळा प्रमुख यांचेवर राहील याची नोंद घ्यावी.

२) शासनस्तर अथवा वरिष्ठ कार्यालयाकडून सदर मान्यतेबाबत काही नव्याने आदेश प्राप्त झाल्यास त्याप्रमाणे कार्यवाही ठेवण्यात येईल.

क.पया पान नंबर २ पहा..

३) संस्थेला इ. ८ वी चा वर्ग परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाहीत. भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत शासनाकडून देण्यात येणार नाही.

४) इ. ८ वी च्या वर्गास शासन निर्णय दि.२९.०६.२०१३ नुसार भौतिक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक राहील. प्राथमिक शाळांच्या संदर्भात आर.टी.ई. ॲक्ट २००९ मध्ये नमुद केलेल्या मानकांची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

५) शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद, शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधीन राहून नेमला पाहिजे. नियुक्त शिक्षक वर्गांची सक्षम प्राधिका-यांकडून मान्यता घेतली पाहिजे. तसेच सदर कर्मचा-यांचे वेतन व भत्ते नियमानुसार संस्थेने दिले पाहिजेत.

६) संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम,पाठ्यपुस्तके, मुल्यांकन पध्दती शालेय व सहशालेय/कार्यक्रम उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत.

७) संस्थेने डॉ.डी. वाय.पाटील विद्यानिकेतन, साळोखेनगर, कोल्हापूर या स्वयंअर्थसहाय्यित शाळेतील इ. ८ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी / कर्मचा-यांसाठी विहित नोंदवह्या अद्यावत व विश्वासाई स्वरुपता कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

८) संस्थेने`/शाळेने माध्यमिक शाळा संहिता,महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील तरतुदी तसेच शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(शंकर केशव यादव)
**प्रशासनाधिकारी**
**प्राथमिक शिक्षण समिती, म.न.पा.,**
**कोल्हापूर.**

<u>प्रत सविनय सादर</u> –
मा.शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

SECRETARY
D.Y.PATIL PRATISHTHAN
KOLHAPUR

PRINCIPAL
D. Y. Patil Vidyaniketan
CBSE School
Salokhe Nagar, Kolhapur